सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी राज्य हिस्स्यापोटी (४०%) निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रजयो-२०१९/प्र.क्र. १६३ /आरोग्य-६
गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, १० मजला,
मंत्रालय, एल.टी. मार्ग, मुंबई
तारीख: १६ सप्टेंबर, २०१९

वाचा -

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६, दिनांक २१ सप्टेंबर,२०१८.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६, दिनांक २६ फेब्रुवारी,२०१९.
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१ एप्रिल, २०१९.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन ज्ञापन क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.७७/अर्थसंकल्प, दिनांक ०५ एप्रिल, २०१९.
५) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. मफुयो-२०१८/प्र.क्र.३०३/आरोग्य-६, दिनांक ०३ जुलै, २०१९.
६) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८ जुलै, २०१९.
७) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. प्रजयो-२०१९/प्र.क्र.१२६/आरोग्य-६, दिनांक १८ जुलै, २०१९.
८) राज्य आरोग्य हमी सोसायटी यांचे पत्र क्र. जा.क्र.राआहसो/कक्ष-२/टे-१/ निधी वितरण /५५२६/९१० /२०१९ दिनांक ०८ ऑगस्ट, २०१९.
९) राज्य आरोग्य हमी सोसायटी यांचे पत्र क्र. जा.क्र.राआहसो/कक्ष-२/टे-१/ निधी वितरण /५४२६/९७६ /२०१९ दिनांक ११ सप्टेंबर, २०१९.

प्रस्तावना -

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही केंद्र पुरस्कृत योजना केंद्र व राज्य शासनाच्या सहभागातून राज्यात राबविण्यात येत असून यामध्ये केंद्र शासनाचा ६०% व राज्य शासनाचा ४०% आर्थिक सहभाग आहे. सदर योजनेसाठी सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील ०१ ऑक्टोंबर, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीकरीता केंद्राकडे रू. ८१,०४,०२,०५९/- (रुपये एक्क्याऐशी कोटी चार लक्ष दोन

हजार एकोणसाठ फक्त) एवढ्या निधीची मागणी करण्यात आलेली आहे. राज्य शासनाच्या हिस्स्यापोटीचा ४० टक्के निधी Escrow Account मध्ये जमा झाल्यानंतर केंद्र शासनाच्या हिस्स्यापोटीचा ६० टक्के निधी Escrow Account जमा होईल. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात २२१० जी ४४९ (राज्य हिस्सा ४० टक्के) या लेखाशिर्षाखाली रू. १२०,००,००,०००/-(एकशे वीस कोटी फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे. सदर तरतूदीपैकी प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी ०१ ऑक्टोंबर, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीकरीता राज्य हिस्स्यापोटी रक्कम रू. ५४,०२,६८,०३९/- (रूपये चोपन्न कोटी दोन लक्ष अडुसष्ट हजार एकोणचाळीस फक्त) Escrow Account मध्ये वर्ग करण्यासाठी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी राज्य शासनाच्या हिस्स्यापैकी (४० टक्के) रक्कम रु. ५४,०२,६८,०३९/- (रूपये चोपन्न कोटी दोन लक्ष अडुसष्ट हजार एकोणचाळीस फक्त) एवढा सशर्त निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर निधी सोसायटीकडे वर्ग करण्यास अनुदानाचे देयक अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांच्याकडे सादर करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी तसेच सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी असतील.

३. वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसंकल्प-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९ सोबतच्या परिशिष्ठामधील अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच या शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी योजनेच्या अंमलबजावणीसाठी उघडण्यात आलेल्या Escrow Account मध्ये जमा झाल्यानंतर सदर निधी योजनेच्या लाभार्थ्यांच्या विमा हप्त्यापोटी विमा कंपनीस अदा करण्यात येणार आहे, असे प्रमाणित करण्यात येत आहे.

४. सार्वजनिक आरोग्य विभाग ज्ञापन क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.७७/अर्थसंकल्प, दिनांक ०५ एप्रिल, २०१९ मधील तरतुदीनुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षात २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१-नागरी आरोग्य सेवा- विषमचिकित्सा ११०- रुग्णालये व दवाखाने ०७-आयुष्यमान भारत कार्यक्रम (०७) (०२)-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (कार्यक्रम) (राज्य हिस्सा ४० टक्के) २२१० जी

४४९, ३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली मंजूर झालेल्या तरतुदीच्या मर्यादेत खर्च करण्यात यावा.

५. सदरील खर्च हा सशर्त असून केलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व योजनेच्या प्रगतीचा अहवाल केंद्र व राज्य शासनास विहित प्रपत्रात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वेळोवेळी पाठविण्यात यावा. तसेच सदरील निधी हा सन २०१९-२० या आर्थिक वर्षात खर्च करण्यात यावा. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी प्राप्त झालेल्या अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

६. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८.०७.२०१९ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१६१४०१५६३२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Nivruti Gadge

Digitally signed by Subhash Nivruti Gadge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b1f74930407346db2703eca69fb25a73a3ba8647d94e4c83579e877eeaa6372e, serialNumber=8aa1f531272224e355732cc20c64b2a014c4d982a276b8f3e7048995acbf1651, cn=Subhash Nivruti Gadge
Date: 2019.09.16 15:04:23 +05'30'

(सु.नि.गाडगे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई
६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
७. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.

८. प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई. (३प्रती)
९. नियोजन विभाग (कार्यासन१४७२), मंत्रालय, मुंबई
१०.वित्त विभाग, कार्यासन - व्यय -१३/अर्थसंकल्प-९, मंत्रालय, मुंबई-३२.
११.अर्थसंकल्प शाखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.निवड नस्ती.